Mahratta
Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# महाराष्ट्राच्या आधुनिक नृत्यइतिहासातील कथकचे योगदान

सौ . नीलिमा हिरवे
एम . ए (कथक, मराठी, भूगोल , पुरातत्वविद्या),कथकनृत्यालंकार , तबलाविशारद
संपर्क – ९७६३५६८७७६, ई-मेल - nilsrushti@gmail.com

**सारांश**

उत्तरप्रदेशाचे शास्त्रीयनृत्य कथक आहे आणि कथक नृत्याचे महाराष्ट्रात येणे, स्थिरावणे आणि विकसित होणे यामागे महाराष्ट्रातील अनेक कथककलाकारांचे योगदान आहे. आज महाराष्ट्राची थोर संतपरंपरा व संतसाहित्य जसे जगभर प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील शास्त्रीय नृत्याचे योगदान अतुलनीय आहे. त्याचा इतिहास प्रकाशित होणे आणि पुढील पिढीतील नृत्यशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यन्त पोहचविणे हाच या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.महाराष्ट्रातीलमुंबई, पुणेसारख्या शहरांमधून ह्या कला रुजल्या, विकसित झाल्या आणि समाजाने आपल्याशा केल्या तेव्हाच या शास्त्रीयनृत्याची पायांमुळे रुजली गेली .

महाराष्ट्राच्या नृत्यइतिहासातील हा अलिखित नृत्याचा इतिहास ह्या शोधनिबंधाच्या माध्यमातून प्रकाशित व्हावा हेच या संशोधनामागचे उद्दिष्ट.

**नमुना शब्द** ( KEYWORDS )- कथक गुरु,कथक इतिहास कथकनृत्य – हिंदी चित्रपट ,कथक - महाराष्ट्र ,पं . लच्छु महाराज ,पं . सीतारादेवी ,पं. रोहिणी भाटे ,पं. मोहनराव कल्याणपूरकर

**प्रस्तावना -**

महाराष्ट्राच्या नृत्यइतिहासाचा , नृत्यसंस्कृतीचा विचार करता असे लक्षात येतेकी येथे लोककला, लोकनृत्ये अधिक रुजल्या आहेत आणि लोककला या मौखिकपरंपरेतून पुढे येत राहतात, विकसित होतात, नाश पावतात आणि पुर्नविकसित होतात.

त्यामुळे लोककलांनी संपन्न महाराष्ट्रातील कथकच्या वाटचालीचे म्हणावे तसे ठोस लिखितसाहित्य सापडत नाही. कथकनृत्याचा इतिहास हा कथकवर आधारीत अनेक पुस्तकांमधून दिसून येतो[1234] पण विशेषतः महाराष्ट्रातील याचा विकास याविषयी अनेक गुरुवर्यांकडून ऐकण्यात आले म्हणूनच त्याचे लिखित स्वरूपात नोंदी असणे आवश्यक आहे असे लक्षात आले.

कथक नृत्यकला ही देखील गुरूंकडून शिष्याकडे पोहचवली जाते त्यामुळे मौखिक संस्कारांनाच महत्व अधिक आहे. माझ्या गुरूंनी त्यांच्या गुरूंकडून ऐकलेल्या गोष्टी आणि त्यांच्या गुरूंनी त्यांच्या गुरूंकडून ऐकलेल्या गोष्टी अशाच प्रवाहातून या कला विकसित होत जातात. त्यांचा अलिखित इतिहासही असाच मौखिक होतो. म्हणूनच लोककला व लोकनृत्यांनी संपन्न महाराष्ट्राने या कथकसारख्या उत्तर भारतीय कलेला आपलेसे कसे केले यासाठी काही विशेष संशोधन करावेसे वाटले .

**संशोधनासाठी वापरलेली साधने**

१) मौखिक साहित्य –

अनेक कथक गुरूंशी संवाद व मुद्द्यांचे विश्लेषण .

२) लिखित साहित्य –

अनेक ग्रंथांचा अभ्यास

चित्रपट सृष्टी निगडित साहित्य

कथक इतिहासासंबंधित विविध ग्रंथ

३)द्रुक श्राव्य साधने

गूगल , यु ट्यूबच्या माध्यमातून संग्रहित असलेल्यामान्यवर गुरूंच्या मुलाखती , माहिती पट.

**कथकनृत्याचेमहाराष्ट्राच्या नृत्य इतिहासातील योगदान –**

यासाठीनृत्य म्हणजे काय ? हे समजून घेणेही पहिली पायरी आहे. नृत्य म्हणजे आनंदाची परमावधी झाली की त्यातून नृत्य प्रकट होते. शरीराच्या विविध अंगहालचालींतून मनुष्य आपला आनंद व्यक्त करतो. हीच नृत्याची पहिली पायरी होय . यातच पुढे लोकनृत्य आणि शास्त्रीय नृत्य अशा दोन धारांमधून नृत्ये विकसित झाली. लोकनृत्य म्हणजेच कोणत्याही नियमांचे बंधन नसणारे आणि केवळ आनंद प्रकटीकरणासाठी समूहाने केलेले नृत्य आणि शास्त्रीयनृत्यम्हणजेच शास्त्राच्या ,नियमांच्या चौकातील धरून केलेले नृत्य .

प्राचीन काळी भारतीय संस्कृतीत नृत्यकलेचा विकास दोन रूपात झाला . एक म्हणजे देसी नृत्य म्हणजेच लोकनृत्य तर ज्याचा मार्ग निश्चित झाला ते मार्गी नृत्य होय. महाराष्ट्राच्या बाबतीत असे लक्षात येते की येथे लोककलांच्या अंतर्गत प्रत्येक राज्य - गाव - समाजानुसार अनेक कलांचा समावेश येतो . दशावतार, लावणी , लेझीम , पोवाडा , तमाशा, मंगळागौरीचे खेळ , भारूड, कीर्तन , दिवाळीची गाणी, मानवी वाघ असे अनेक . तर यातूनही लोकनृत्ये वेगळी करायची झाली तर त्याची ही एक समृद्ध परंपरा आहे हे लक्षात येते –



१) गौड, भिल्ल, कातकरी , ठाकर यांचा ढोलाचा नाच , तारपीचा नाच , कडक लक्ष्मी , भगत , वीर ह्यांची धार्मिक नृत्ये.

२)नागर समाज - टिपरी नृत्य, गोफ नृत्य

३)लेझीम - क्रीडाप्रधान लोकनृत्यप्रकार

४)दिंडी - धार्मिक आशयाचे नृत्य

५) तमाशा - लोकनाट्य प्रकारातील लावणी

६) मंगळागौर खेळ ( झिम्मा , गोफ , टिपऱ्या ,फुगडी इ. नृत्य प्रकार )

७) भिल्ल समाजातील बारी घालणे , हे अंत्यविधी प्रसंगी केले जाणारे नृत्य आहे . या सगळ्या नृत्यपरंपरांमधील एकाही नृत्य परंपरेला शास्त्रीय नृत्याचा दर्जा मिळालेली नाहीकारण या लोकनृत्य कला म्हणूनच विकसित झाल्या .

तरीही महाराष्ट्रात कथकचा विकास इतक्या मोठ्या प्रमाणात झाला आहे . कथकनृत्याचा महाराष्ट्रातील विकासाच्या टप्प्याचा आढावा घेण्यासाठी खालील मुद्यांचे सर्वेक्षण केले -

**अ) कथकनृत्याचे हिंदी चित्रपट सृष्टीतील योगदान ( कार्यक्षेत्र मुंबई )**

**ब)कथकनृत्य कलाकारांचे महाराष्ट्रातील योगदान**

**क)कथक नृत्य शिक्षण देणाऱ्या कलासंस्थांचे योगदान.**

**अ ) कथक नृत्याचे हिंदी चित्रपट सृष्टीतील योगदान -**

महाराष्ट्रात कथकनृत्याचा सर्वसामान्यांपर्यंत परिचय होण्यामागे हिंदी चित्रपटसृष्टीचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. १९३४ साली प्रदर्शित झालेल्या ' शहर का जादू ' या चित्रपटातील नृत्यात त्या काळातील कथकनृत्याचे स्वरूप पाहायला मिळते . नृत्यसंरचनेतून अशा जुन्या अनेक हिंदी चित्रपटातील नृत्यातून कथकनृत्यशैली आणि त्याकाळी कथकनृत्याचे असलेले स्वरूप स्पष्ट दिसून येते .अनेक श्रेष्ठ घराणेदार कथकनृत्यकलाकार ह्या चित्रपटसृष्टीकडे आकर्षित झाले, महाराष्ट्रात आले आणि स्थिरावले. त्यात सोहनलाल ,लच्छु महाराज , सीतारादेवी , गोपीकृष्ण ही काही ठळक नावे . ह्या कथक कलाकारांनी चित्रपटात भूमिका साकारल्या तर काहींनी चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शन केले आणि कथकला समाजासमोर या माध्यमातून मानले आणि लोकप्रिय केले.

हा सगळा प्रवास स्वातंत्र्यपूर्वकाळापासून आजपर्यंत चालू आहे. ह्या काळातील कथकनृत्याचा समावेश असणारे चित्रपट - शहर का जादू ( १९३४), नगिना ( १९३८), मुगल - ए - आझम ( १९६०), झनक झनक पायल बाजे (१९५५) , परिणिता (१९५५), जलसाघर (१९५८), गाईड (१९६५)

**ब ) कथक नृत्य कलाकारांचे महाराष्ट्रातील योगदान -**


महाराष्ट्रात चित्रपटसृष्टीतील अनेक कथकनृत्य कलाकार स्थिरावले आणि त्यांनी नृत्य शिक्षणाच्या माध्यमातून महाराष्ट्रात कथक रुजविले.त्यांचे महाराष्ट्रातील कथकनृत्याच्या विकासातील योगदान मोलाचे आहे. त्यापैकी काही कलाकारांच्या कार्याचा आढावा घेतला.

**१)पं . लच्छु महाराज (१९०७-१०७६)-**



जन्म - लखनौ येथील परिवारातील. नंतर मुंबईमध्ये आगमन झाले आणि चित्रपटसृष्टीद्वारे कथकनृत्याला दर्शकांपर्यंत आणण्याचा मोलाचा वाट त्यांचा आहे. त्यांनी दिग्दर्शित केलेले काही चित्रपट - महल (१९४९), मुगल - ए - आझम (१९६०), पाकिझाह (१९७२)

**२) पं . सोहनलाल –(जन्म १९२०, जयपूर , राजस्थान )**



मुंबईतील आगमन आणि ५५ हिंदी चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शन त्यांनी केले . साधना (१९५८), गाईड (१९६५) ते ज्वेल थीफ (१९६७) असे अनेक . त्यांची शिष्या सरोज खान ह्यांनी देखील त्यांची नृत्यदिग्दर्शनाची परंपरा , वारसा पुढे चालविला.

ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org




**३) कथकक्वीन पं सितारा देवी (जन्म १९२०,कलकत्ता , मृत्यु २०१४)[2]**

वयाच्या ११व्या वर्षांपासून मुंबईत वास्तव्यास सुरवात झाली. मुंबईत त्यांनी जहांगीर हॉलमध्ये नृत्याचा पहिला सार्वजनिक कार्यक्रम प्रस्तुत केला, तो काळ ब्रिटिश राजवटीचा होता. जवळजवळ ६० वर्षे कथकनृत्य प्रशिक्षण देण्याचे कार्य त्यांनी केले आणि आयुष्यभर त्या कथक क्वीन आणि एक अभिनेत्री म्हणून जगल्या.

**४) पं . गोपीकृष्ण (१९३५-१९९४)-**

बनारस घराण्याचे प्रसिद्ध नर्तक- चित्रपटसृष्टीतील एक विख्यात नाव. वयाच्या १७व्या वर्षी हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये आगमन केले. १९५२ मध्ये पहिला चित्रपट साकी, झनक झनक पायल बाजे (१९५५) या सारख्या अनेक चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शन केले आणि भूमिकाही साकारल्या. नटवर भवन डान्स अकॅडमी , नटेश्वर नृत्य कला मंदिर सारख्या संस्था मुंबईमध्ये स्थापन करून कथक नृत्याचा प्रचार आणि प्रसार त्यांनी केला .

**५) रोशन कुमारी [2]–**

कथकनर्तिका , महाराज बिन्दादिन स्कूलऑफ कथक , मुंबईमध्ये सुंदरप्रसादजीकडे नृत्याचे शिक्षण घेतले. अनेक चित्रपटांमधून त्यांची नृत्यप्रस्तुती पहावयास मिळते. परिणीता ,वारीस, मिर्झा गालिम (१९५४), जलसाघर (१९५८) अशा अनेक चित्रपटातून भूमिका तर सरदारी बेगम(१९९६) चे नृत्यदिग्दर्शन त्यांनी केले आहे .

**६) मोहनराव कल्याणपूरकर[3] –**

१९३५ मध्ये मुंबईमध्ये सुंदरप्रसादजींकडून कथकनृत्याच्या अभ्यासास प्रारंभ . १९३७ मध्ये पं .सुन्दरप्रसादजींच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतील गावदेवी भागात 'महाराज बिन्दादिन नृत्यशाळाची स्थापना. महाराष्ट्राच्या नृत्यइतिहासात याची नोंद म्हणजे खूप महत्वाची बाब आहे .कारण ही संपूर्ण देशातील कथकची पहिली नृत्यशाळा आहे .तर १९४१ साली कथकनृत्याचा व्यवस्थित पाठ्यक्रम बनवून पहिल्यांदा कथकनृत्याची परीक्षा पद्धत सुरु केली.

**७) दमयंती जोशी (५ डिसेंबर १९२८, मुंबई )**

दमयंतीजींनी सीतारामप्रसाद यांच्याकडे नृत्यशिक्षण घेतले. १९३६ मध्ये बर्लिन येथे आयोजित डान्स ऑलम्पिक मध्ये नृत्याचा प्रथम पुरस्कार मिळाविणारी नृत्यांगना. खंडाळा येथे मॅडम मेनका ह्यांच्या नृत्यशाळेतही त्यांनी हजेरी लावली होती आणि त्या मॅडम मेनका यांच्या नृत्यसंरचनेतही सहभागी झाल्या होत्या.

**८) पं . रोहिणी भाटे (जन्म : १४ नोव्हेंबर १९२४ , पाटणा१० ऑक्टोबर २००८)**



जयपूर , लखनौ घराण्याच्या कथक नर्तिका. रोहिणीताईंचे पुणे येथे वास्तव्य १९५६ साली सुरु झाले. १९५६साली श्री. जयदेवांच्या गीतगोविंदचा त्यांनी नृत्यांकन करण्याचा प्रयास केला होता . १० जुलै १९४७ ला स्वतःचा नृत्यवर्ग सुरु केला, जेव्हा १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी पुण्यामध्ये कथकनृत्यवर्गाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. त्या काळात त्यांनी आपले नृत्यशिक्षण १९४६ मध्ये बेंगलोरला गुरु सोहनलाल ह्यांच्याकडे घेतले तर पुणे - मुंबई ,पुणे - लखनौ असा प्रवास करत गुरु मन्नालाल, गुरु मोहनराव कल्याणपूरकर ह्या गुरूंकडून नृत्यशिक्षण घेतले . त्यांनी स्थापन केलेली नृत्यभारती ही संस्था आजही पुण्यात कार्यरत आहे.

असे अनेक नृत्यगुरुचें योगदानाने कथक नृत्याचा परिचय महाराष्ट्राला झाला . अनेक नृत्यगुरूंनी नृत्यवर्गांच्या माध्यमातून ही कला शिकविण्यास सुरवात केली. त्यातून समाजाची नृत्याची आवड जोपासली गेली आणि वाढत गेली.

**ब ) नृत्यसंस्थांचे समाजातील योगदान** -

त्या काळी कार्यरत असलेल्या संस्थांनी कथकनृत्याचे प्रशिक्षण देणे चालू ठेवले तसेच कार्यक्रमांमधून नृत्यप्रस्तुती करत राहिले त्यामुळे कथक महाराष्ट्रात रुजण्यात मोलाची भर पडली.

**नृत्याचा प्रसार आणि प्रचार करणाऱ्या काही संस्था :**

१) बिन्दादिन स्कूल ऑफ कथक (मुंबई) : भारतातील पहिली कथक नृत्य शाळा

3) नटेश्वर भवन डान्स अकादमी, मुंबई

४)नटेश्वर नृत्यकला मंदिर , मुंबई

५)मॅडम मेनका , खंडाळा नृत्यशाळा

६) नृत्यभारती , पुणे

७) कला छाया , पुणे ; संस्थापिका : पं . प्रभा मराठे

८) कला कीर्ती केंद्र : संस्थापिका कथकक्वीन स्वर्गीय पं. सितारा देवी, जयंती माला

९) पदन्यास , पुणे ; संस्थापिका : पं . सुजाता नातू

१०)मनीषा नृत्यालय , पुणे : संस्थापिका : पं . मनीषा साठे

११) नादरूप ,पुणे ; संस्थापिका : पं . शमा भाटे

**कथकनृत्याचे महाराष्ट्राच्या नृत्यइतिहासातील योगदान :**

महाराष्ट्राची कथक नृत्यशैली ही शास्त्रीय नृत्यशैली नसूनही महाराष्ट्रामध्ये ही रुजल्यापासून आजपर्यंत जवळजवळ संपूर्ण महाराष्ट्राला व्यापणारी ही नृत्यशैली ठरली आहे. नृत्याचे शिक्षण घेणे हे एकतर उच्चभ्रू समाजाचा छंदच नाही तर कोठीवरील नृत्याची गरज होती. परंतु काळानुरूप या नृत्याने आपली आवड समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचविली.

जेव्हा स्त्री उंबऱ्याबाहेर पडणे ही अवघड होते तेव्हा नृत्याची आवड जोपासण्याचे स्वातंत्र्य मिळाले ते पुण्यातील रोहिणीताई भाटे ह्यांच्या योगदानाने .

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात आता नृत्यवर्ग सुरु झाले आहेत. सौन्दर्य मूल्यांच्या आधारावर , गुणात्मक स्तरावर तसेच अभिजातता सांभाळत पुण्याचे कथक नृत्य इतिहासातील स्थान अव्वल राहिले .[7]रोहिणी ताईंच्या याच कार्याला प्रभा मराठे, मनीषा साठे , नंदकिशोर कपोते, सुजाता नातू, शमा भाटे यांनीही कथक नृत्याचा झेंडा सर्वदूर फडकावला .[7]

महाराष्ट्रातील अन्य राज्यांमधून सुरु असलेला कथकचा प्रचार यासाठी सर्वेक्षण केले ..त्यातील काही प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि प्रचारकांची नावे आवर्जून नमूद करत आहे

१) **नाशिक** : रेखा नाडगौडा ( किर्ती कला मंदिर), विद्याहरी देशपांडे , संजीवनी कुलकर्णी

२) **औरंगाबाद** : पार्वती दत्ता ,(महागामी गुरुकुल)

३) **सोलापूर** : मनीषा जोशी ,( अर्पित कथक नृत्यालय )

४) **कोल्हापूर** : अर्चना कुलकर्णी, रमा कुलकर्णी ,(प्रकाश नृत्यालय),अमिषा करंबेळकर (कथकनृत्य केंद्र )

५) **रत्नागिरी** : अशोक आखाडे , मेधा आठल्ये

६) **सांगली**: कल्याणी पटवर्धन

७) **देवरुख** : शिल्पा मुंगळे

८) **भुसावळ** : मुकेश खपली ,रमाकांत भालेराव

९) **जळगाव** : डॉ . अपर्णा भट

१०) **मिरज** : अमिषा करंबेळकर (कथकनृत्य केंद्र )

११) **अलिबाग** : अमोल कापसे ,( नमन नृत्य संस्था )

१२ ) **नारायणगाव, शिरूर** : सतीश साकीनाल

१३) **चाळीसगाव** : कविता बागुल

१४) **नागपूर** : रुही मासोदकर , कथक साधना केंद्र

१५) **अकोला** : डॉ . वर्षा पाटील , राधिका साठे

१६) **इचलकरंजी** : सायली होगाडे

१७)**अक्कलकोट** : पल्लवी नखाते

१८) **बारामती , वालचंदनगर , सासवड,भोर :** नीलिमा हिरवे

१९) **बीड :** जय श्रीराम क्लास

**कथक नृत्याला मिळालेला सांस्कृतिक दर्जा**

फार प्राचीन काळापासूनच काळानं राजाश्रय मिळत गेला त्यामुळेच कला विकसित झाल्या .. दरबार परंपरांचा लोप पावल्यावार या कला रंगमंचावर आल्या .[2,3] कुठलीही कला समाजाभिमुख होण्यासाठी आधी ती समाज प्रिय होणे आवश्यक असते यासाठी तिची वारंवार प्रस्तुती होणे गरजेचे असते . महाराष्ट्रात कथक रुजू लागल्यावर अशा प्रकारे वारंवार अनेक सांस्कृतिक कार्यक्रमातून या कलेची प्रस्तुती होऊ लागली त्यामुळे तिची प्रसिद्धी वाढत गेली .महाराष्ट्रातील छोट्या मोठ्या मैफिली, कार्यक्रमांबरोबर अनेक मानाच्या महोत्सवातूनही कथक कलाकारांच्या प्रस्तुती सादर होऊ लागल्या.अनेक लोकप्रिय संगीत महोत्सवातून कथकनृत्याच्या प्रस्तुतीचा समावेश झालेला आहे. सवाई गंधर्व महोत्सव , काला घोडा महोत्सव, वसंतोत्सव , एलिफन्टा महोत्सव .

महाराष्ट्राचे लोकनृत्य लावणीमध्ये कथकचा प्रभाव दिसून येतो तसेच बैठकीची लावणी आणि ठुमरीवरील भावप्रदर्शनामध्ये साम्य जाणवते .

**कथक नृत्यातून उच्च माध्यमिक तसेच संशोधनानात्मक शिक्षण घेता येते अशी महाराष्ट्रातील काही ठळक विद्यापीठे**

१) सावित्रीबाई फुले विद्यापीठ ,(पुणे)२) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ(पुणे), ३) भारती विद्यापीठ (पुणे)४) महागामी गुरुकुल (औरंगाबाद ), ५) एस एन डी टी (मुंबई ), ६) नालंदा विद्यापीठ (मुंबई ), ७) कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ (नागपूर) . गेल्या २० वर्षांमध्ये शाळा, महाविद्यालयांमधून कथकचे विशेष शिक्षण दिले जाते आहे तसेच कथकनृत्य विषयामध्ये पदवी घेता येते आहे तसेच काही नृत्याभ्यासाक संशोधन करून PHD मिळवित आहेत .

**कथक नृत्य इतिहासातील महाराष्ट्रातील कथक कलाकारांचे योगदान :**

महाराष्ट्राच्या नृत्याचे योगदान जेवढे महत्वपूर्ण तेवढेच कथकनृत्यइतिहासातील महाराष्ट्रातील नर्तकांचे योगदान ही विशेष आहे. कथकमधील अनेक नवरचनांची निर्मिती महाराष्ट्रामध्ये झाली. अनेक अनवट तालांची निर्मिती (उदा. ताल : चित्ररुपक; मात्र १०// तसेच ताल भिन्नलोभा मात्रा ६// या दोन्ही तालांची रचना रोहिणीताई आहेत .) तोडे , तुकडे यांच्या हजारो रचना, गंगा जमुना बंदिश , तराणे, त्रिवट या नृत्यसाहित्यात महाराष्ट्रातील कथकगुरूंनी मोलाची भर घातली आहे .

अनेक नृत्यसंरचना तसेच नृत्यनाट्यांचे यशस्वी प्रयोग केले आहेत . भाषासाहित्याचा भरभरून प्रयोग नृत्यसाहित्यात याच भूमीत झाला . अनेक भजन, ठुमरी, दादरे , अभंग या साहित्यावर कथक आकारले आणि कथकचा वस्तुसंग्रह वाढवला आहे .

अनेक दर्जेदार गुरु, नर्तक, कलाकार महाराष्ट्राने कथकला दिले याची स्वतंत्र नोंद करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील काही गुरु, नर्तकांची नावे : प्रभा मराठें, मनीषा साठे , सुजाता नातू , शमा भाटे , आशा जोगळेकर , मंजिरी देव , मुक्ता जोशी , उमा डोग्रा इ

महाराष्ट्रात कथक प्रशिक्षण घेतलेलं अनेक कथक नृत्य कलाकार परदेशात नृत्य शिक्षण देत आहेत काही तिकडे स्थायिक झाले आहेत तर काही इंटरनेटच्या माध्यमातून कथकचा प्रचार , प्रसार करीत आहेत . अश्विनी काळसेकर( लंडन ),अर्चना जोगळेकर( न्यू जर्सी),शाम्भवीदांडेकर(कॅलिफोर्निया ,अमेरिका ) , कावेरी आगाशे .

(ऑस्ट्रिया ) ही त्यातील विशेष उल्लेखनीय नावे.

## निरीक्षण आणि सारांश

प्रत्येकराष्ट्रांची संस्कृतिक संपत्ती हीच तिची खरी समृद्धता आहे . भारतभूमी शिल्प, चित्र,नृत्य,साहित्यया कलांनी नटलेली आहे. याचे संवर्धन करणे, त्याची नोंद ठेवणे ही भारतीय म्हणूनआपली जबाबदारी आहे. माझ्या शोधनिबंधच्याविषयातूनमहाराष्ट्राच्या नृत्यइतिहासाला नवा दृष्टीकोन देण्याचा प्रयत्न आहे. नृत्यकला हीमुळात दृकश्राव्य कला असून मौखिक परंपरेच्या आधारानेच विस्तारते आहे तर एकीकडेलोपही पावते आहे. या शोधनिबांधाच्या माध्यमातुन महाराष्ट्राच्या नृत्यकलेच्या इतिहासाची पायांमुळेघट्ट करण्याचा या इतिहासामधील कथकसारख्या उत्तरप्रेदेशीय शास्त्रीय नृत्यशैलीच्या योगदानाविषयी,त्याच्यामध्ये भर घालण्याच्याप्रयत्नआहे. या पुढील १०० वर्षेनंतर महाराष्ट्राच्यानृत्यइतिहासातील आताच्या काळातील हे दाखले नक्की उपयोगी ठरतील . कारण आजचा आधुनिककाळाचाइतिहास भविष्यात प्राचीन इतिहासठरणार आहे. तो लेखनातून, नोंदीतून समृद्ध असावा हाच आजचा प्रयत्न.

## संदर्भ ग्रंथ

१) गर्ग लक्ष्मीनारायण , कथक नृत्य ;संगीत कार्यालय ( हाथरस ) ; १९८१

२) डॉ . दधीच पुरु , कथक नृत्य शिक्षा , बिंदु प्रकाशन

३) डॉ . देव मंजिरी , नृत्यसौरभ , देव मंजिरी ; १९९४

४) ज्योतिषी चेतना , कथक कल्पद्रुम , स्वाती पब्लिकेशन्स ( दिल्ली ) ; २०१९

५) भाटे रोहिणी , लहेजा

६) चौधरी प्रतापसिंह , कथकनृत्य – तथ्य और विश्लेषण , ऋचा प्रकाशन ( जयपूर ) ; २०१४

७) भाटे शमा , अधुरी नृत्य गाथा , महाराष्ट्र टाइम्स , २७ डिसेंबर २०२०

८) बाला जीवन , Kathak - its origin , development and Historical perspective , Naad-nartan journal of Dance and Music , २०१४

९) भागचंदानी सुमन , Institution of Change : Kathak Dance from courts and classroom , The Chitrolekha Journal on Art and Design , 2018

१०) सक्सेना मानसी , Innovative Changes in Kathak due to Globalisation , Kanishka Publishers , 2018

Mahratta